


NEHRU BAL PUSTAKALAYA

# ऐका कथा चहाची

**अरूपकुमार दत्त**

अनुवाद
**ज्ञानदा नाईक**


रु. 13.00 ISBN 81-237-1212-X

एकं सूते सकलम्

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया



नेहरू बाल पुस्तकालय


# ऐका कथा चहाची


अरूपकुमार दत्त

अनुवाद
ज्ञानदा नाईक

चित्रे
मृणाल मित्र

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया





ISBN 81-237-1212-X

पहिली आवृत्ती 1995 (*शके* 1916)
दुसरी आवृत्ती 2002 (*शके* 1923)
मूळ © अरूपकुमार दत्त, 1985
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1995
A Story About Tea *(Marathi)*

**रु. 13.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.

# I

छोटी आगगाडी एका रस्त्यालगतच्या स्थानकावर येऊन थांबली. ड्रायव्हरने ब्रेक दाबल्यामुळे गाडीला धक्का बसला आणि त्या धक्क्यामुळे राजवीर सिंग, एक शीख मुलगा - वय वर्ष तेरा - जागा झाला. त्याचा मित्र प्रंजोल खिडकीजवळ बसला होता. तो हेरकथा वाचण्यात दंग झाला होता.

प्रंजोल हा छोटा असामी मुलगा, राजवीरचा वर्गमित्र होता तो. ते दोघे दिल्लीच्या एका शाळेत शिकत होते. प्रंजोलचे वडील आसाममध्ये चहाच्या मळ्याचे व्यवस्थापक होते. प्रंजोलने राजवीरला आपल्या घरी येण्याचे आमंत्रण दिले होते आणि राजवीरने ते लगेच स्वीकारले होते.

दिल्ली ते आसाम हा प्रवास मोठा होता. त्यांनी विविध प्रकारचे नैसर्गिक देखावे पाहत दोन दिवस आणि दोन रात्री आगगाडीत घालवल्या होत्या. आता ते जवळ जवळ पोचलेच होते.

''झोपाळू मुला, ऊठ.'' प्रंजोल म्हणाला. ''आपण मरीयानीला उतरायचंय. पुढचं स्टेशन. तू जरा चहा पी. तुझी झोप जाईल. चहात कॅफिन असते हे तुला माहीत आहे का ?''

''मी लगेच तयार होतो.'' राजवीर त्याच्या बाकावरून उठत म्हणाला. त्याने पटकन



हातपाय -तोंड धुतले. कपडे बदलले आणि तो आपल्या मित्राशेजारी येऊन बसला.

'चाय गरम...गरम...चाय'' एक विक्रेता उंच स्वरात ओरडत होता. विक्रेता त्यांच्या खिडकीजवळ आला आणि म्हणाला, ''चाय साब ?''





''दोन कप.'' प्रंजोल म्हणाला.

ते चहा प्यायला लागले. त्यांच्या डब्यातले जवळ जवळ सगळेच लोक चहा पीत होते.

''तुला माहीत आहे, जगात 80,00,00,000 कपांपेक्षा जास्त चहा प्यायला जातो.'' राजवीरने विचारले.

''बापरे'' प्रंजोल मोठ्याने ओरडला. ''चहा फारच लोकप्रिय आहे.''

गाडी सुरू झाली. प्रंजोलने पुन्हा त्याच्या हेरकथेत डोके खुपसले. राजवीरलापण हेरकथा

वाचायला खूप आवडायच्या. पण त्या वेळी त्याला भोवतालच्या देखाव्यात जास्त रस वाटत होता.

सगळीकडे हिरवेगार होते. असं गर्द हिरवं रान त्याने कधीच पाहिलं नव्हतं. नंतर हिरव्यागार भाताच्या शेतीची जागा चहाच्या मळ्यांनी घेतली. तो देखावा भव्य होता. दाट वृक्षाच्छादित टेकड्यांच्या पार्श्वभूमीवर चहाची झुडपे पसरली होती.

उंच विशाल वृक्षाखाली चहाची रोपे बुटकी दिसत होती. रांगेत लावलेल्या झुडपातून बाहुल्याएवढ्या आकृत्या हालचाल करताना दिसत होत्या. थोड्या दूरवर एका जुनाट इमारतीच्या उंच धुराड्यातून धूर येत होता.

"अरे वा, चहाचा मळा!" राजवीर ओरडला.





प्रंजोल एका मळ्यावरच जन्माला आला होता. तिथेच वाढला होता. त्यामुळे त्याला फारसा आनंद झालेला नव्हता.

"अरे, आपण आता चहाच्या प्रदेशात आहोत," तो म्हणाला. "जगात आसाममध्येच सर्वांत जास्त चहाचे मळे आहेत. आता तुला खूप चहाच्या बागा दिसतील."

"मला जेवढे चहाबद्दल वाचता येईल तेवढे मी वाचले." राजवीर म्हणाला. "चहाचा शोध खरा कसा लागला हे कुणालाच माहीत नाही. पण त्याबद्दल खूप दंतकथा आहेत."

"कोणत्या दंतकथा?"

"एक चिनी सम्राटाबद्दल आहे. तो पाणी पिण्याआधी ते नेहमी उकळवायचा. एके दिवशी भांड्याखाली जळणाऱ्या काटक्यांची काही पाने त्या पाण्यात पडली. त्यामुळे त्या पाण्याला छान चव आली. असे म्हणतात की ती चहाची पाने होती."

प्रंजोलने त्याची टर उडवली. "वा वा काय गोष्ट आहे. आणखी एक सांग बरे!"

"एक भारतीय दंतकथा आहे. एका प्राचीन बौद्ध तपस्वीबद्दल. बोधी इर्धांना, त्यांनी

त्यांच्या पापण्या कापून टाकल्या. कारण तपस्या करताना त्यांना झोप आली. त्या पापण्यांपासून दहा चहाची झाडे तयार झाली. या झाडांची पाने गरम पाण्यात घालून प्यायल्यास झोप जाते.''

''चहा पहिल्यांदा चीन देशात प्यायला गेला.'' राजवीर म्हणाला, ''इ.स. पूर्व 2700 च्या काळात! खरे तर चाय आणि चिनी शब्द चिनी आहेत. चहा युरोपमध्ये सोळाव्या शतकात आला आणि तो रुचकर पेय म्हणून पिण्यापेक्षा औषध म्हणूनच प्यायला जाऊ लागला.''

गाडी मरीयानी जंक्शनवर थांबली. मुलांनी त्यांचे सामान घेतले आणि गजबजलेल्या फलाटावर सारे उतरले.

प्रंजोलचे आई -वडील आले होते. त्यांच्याबरोबर प्रंजोलची बहीण अलका आणि त्यांचा अल्सेशीअन कुत्रा टॅफी होता.

ते गाडीने ढेकीयाबारी चहाच्या मळ्याकडे निघाले. त्याचे व्यवस्थापक प्रंजोलचे वडील होते.

एका तासानी गाडी ढेकीयाबारी चहाच्या मळ्यात आली.

कच्च्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला अनेक एकर चहाचे मळे होते. सगळीच झुडपे सारख्या उंचीवर छाटली होती. बायकांचे समुदाय पाठीवर बांबूच्या टोपल्या घेऊन, प्लॅस्टीकचे ॲप्रन घालून चहाची नवीन पालवी खुडत होते.

जाणाऱ्या ट्रॅक्टरला वाट देण्यासाठी प्रंजोलच्या वडिलांनी गाडीची गती कमी केली.

''हा दुसरा हंगाम आहे नाही का? हा हंगाम मे ते जुलै असतो आणि या काळात सर्वांत चांगले चहाचे पीक येते, हो ना काका?''

''तू घरून याच्याबद्दल बरीच माहिती मिळवून आला आहेस वाटते.''

''हो. पण अजून बरंच काही शिकायची माझी इच्छा आहे, बारूआ काका'' राजवीर म्हणाला.

''चहा कसा येतो हे दाखवायला मी तुला आज दुपारी मळ्यात नेईन.''

ते व्यवस्थापकाच्या बंगल्याकडे आले. ब्रिटीश बागाईतदारानी बांधलेली ती मोठी दुमजली



इमारत होती. छोट्या बांबूचे कुंपण. त्याच्या भोवताली प्रशस्त आवार. पुढे छान हिरवळ होती. बाग लाल, निळ्या, पिवळ्या रंगांच्या फुलांनी बहरली होती.

व्हरांड्याच्या पायऱ्यांवर अर्धी चड्डी आणि शर्ट घालून एक सावळ्या रंगाचा छोटा मुलगा बसला होता. प्रंजोलला पाहून तो हसला.

''हॅलो मंगल'' प्रंजोल ओरडला. ''माझ्या मित्राला भेट. हा राजवीर.'' मंगल पळत आला आणि राजवीरचे हात त्याने हातात घेतले. हा चौकीदार बिरचीचा मुलगा. प्रंजोलने ओळख करून दिली.

''मी आणि मंगल खूप मज्जा करतो. तो गलोल चांगली वापरतो आणि त्याला मासे कसे पकडायचे याबद्दल सगळी माहिती आहे.''

''मला जायला पाहिजे'' मंगल म्हणाला. ''मी फवारा मारणाऱ्यांबरोबर आलो आहे. फक्त भेटायला आलो. सरदारला कळले तर ओरडेल.''

''अच्छा'' म्हणत मंगल निघून गेला.



## II

श्री. बारुआ दुपारी राजवीरला चहाच्या मळ्यात घेऊन गेले. त्यांच्याबरोबर प्रंजोल, अलका आणि टॅफीही होते. ढेकीयाबारी मळा ४०० एक्कर असल्यामुळे त्यांना श्री. बारुआंच्या जीपमधून जावे लागले.

"चहाच्या रोपवाटिकेपासून आपण सुरुवात करू या." श्री. बारुआंनी सुचविले.

वाटेत श्री. बारुआ म्हणाले, "चहाच्या रोपांची खूप काळजी घ्यावी लागते. नत्रवायू, पोटॅशियम, फॉस्फेट ही खते झाडे चांगली वाढण्यासाठी नियमितपणे घालावी लागतात."


"या सगळ्यात नत्रवायू सर्वांत महत्त्वाचा आहे. इतर झाडांसारखी फळे न काढता चहाची पानेच तोडतात. पाने झाडांची स्वयंपाकघरे असल्यामुळे झाडे वाढण्यासाठी नत्रवायू नियमितपणे घालणे आवश्यक आहे."

"ती कधी कधी तांबोरा फोड येणे, कुजणे अशा रोगांनी आजारी पडतात. मग आम्ही रोग कुठला आहे ते पाहून औषधे देतो."

रोपवाटिका रुंद, बुटकी, बांबूच्या भिंती आणि गवताचे छत असलेली इमारत होती. एका भागात छोटे वाफे होते आणि दुसऱ्या प्रत्येकात रोपे असलेल्या हजारो पॉलिथिनच्या पिशव्या होत्या.



रोपवाटिका म्हणजे एक इंच देठाला जोडलेले अंकुर असलेले पान रोप बनवण्यासाठी झाडापासून तोडतात व रोप बनवितात. अशी काढलेली रोपे मातीच्या वाफ्यात किंवा पॉलिथिनच्या पिशव्यात नुसत्या मातीत लावली जातात. त्यांना 10 आठवड्यांत मुळे येतात. एका वर्षाने रोपे लावणीच्या जागी नेली जातात.




बियाणांच्या रोपवाटिकासुद्धा आहेत. पण हल्ली रोपवाटिकांचा जास्त उपयोग करतात. रोपवाटिकेत रोपांची जात तीच राहाते. कारण परागकणांचे वहन होत नाही."

"मग बियाणे का वापरतात ?" राजीवने विचारले.

"उत्तम दर्जाच्या संकरितांसाठी वेगवेगळ्या परागकणांच्या संकराने रोपे बियाणांपासून बनवली जातात. शिवाय बियाणे स्वस्त असतात आणि त्याची जास्त काळजीही घ्यावी लागत नाही."

"काका, रोपांचा झाडात बदल होण्यासाठी किती वेळ लागतो ?"

"पहिल्या वर्षापासून खुडणी सुरू होते. पण झुडपांचा झाडामध्ये बदल खरे तर पाच वर्षांनंतर होतो. चहाच्या झाडाचे एकूण आयुष्य 60 वर्षांचे असते."



ते परत जीपमध्ये बसले आणि श्री. बारूआ त्यांना मंगलचा तांडा जिथे औषधांचा फवारा मारत होता, तिथे घेऊन गेले. मंगल त्यांच्याकडे बघून हसला.

"चला आपण इथे उतरू या" श्री. बारूआ म्हणाले.

चहाच्या झुडपांकडे जायला त्यांना एक डबके ओलांडावे लागले. सुपारीच्या झाडाचा बुंधा त्यांनी पूल म्हणून वापरला. इतरांनी तो बुंध्याचा पूल सहज पार केला. राजवीर मात्र अडचणीत सापडला. पण तो पडणार असे वाटले, नेमका तेव्हाच त्याने कसाबसा तोल सावरला आणि पूल ओलांडला.

सगळ्यांनी त्याचे अभिनंदन केले. टँफीनेसुद्धा भुंकून आनंद व्यक्त केला.

"अरे बापरे, ही डबकी सगळ्या मळ्यातून खेकड्यांसारखी पसरली आहेत की." राजवीर म्हणाला.

"ती बागेच्या जलमार्गाचाच एक भाग आहेत. चहा उष्ण व दमट हवेत आणि मध्यम ते जोरदार पाऊस असलेल्या जागेत चांगला उगवतो. पण जर पावसाचे पाणी साचून राहिले तर मुळे कुजतील आणि झाडे सुकून जातील. ही डबकी पाणी साचू देत नाहीत. आणि मुळांना कुजण्यापासून वाचवतात."

ते फवारणी करणाऱ्या एका गटाकडे आले. प्रत्येकाच्या पाठीवर फवारणीचे यंत्र होते. फवारणी दांडा खाली -वर करून जमिनीच्या पृष्ठभागावर ते यंत्रातील रसायन फवारत होते.

"ते तणनाशके फवारत आहेत. जर ते जंतूनाशके फवारत असते तर त्यांनी झाडे फवारली असती. काही तणे झाडाच्या वाढीला हानीकारक असतात. जमिनीतली ही तणे नष्ट करण्यासाठी जमिनीच्या पृष्ठभागावर ही तणनाशके मारावी लागतात."

"तुम्ही जंतूनाशके म्हणालात. जंतूही चहाच्या झाडावर हल्ला करतात का ?" राजवीरने विचारले.


"हो. मावा, मुरेडया, खाजकुयली कीड हे जंतू खूप नुकसान करू शकतात."

मंगल त्यांच्याकडे आला.

"आम्ही उद्या पोहायला जाणार आहोत. तू येशील ?" प्रंजोलने विचारले.

"हो !" मंगल उत्साहाने म्हणाला. "कधी ?"





"दुपारी. कारण सकाळी बाबा राजवीरला कारखान्यात घेऊन जाणार आहेत."

"ठीक आहे. पोहणे संपल्यावर आपल्याला मासेसुद्धा पकडता येतील. माझे मासे पकडायचे नवे गळ नीट आहेत का ते कळेल!"

तांबड्या चोचीच्या राघूंचा थवा कलकलाट करत त्यांच्या डोक्यावरून गेला आणि एका सावलीच्या भल्याथोरल्या झाडावर विसावला. निळ्याभोर आकाशात घारींची एक जोडी उंच भरारत गेली. घरट्याकडे पावले टाकणारा छोटा बगळाही त्यांना दिसला.

### III

मंगलचा निरोप घेऊन ते जीपकडे परतले. उंच झाडांमधून सूर्याची उतरती किरणे झिरपत होती. चहाच्या मळ्यांवर त्या सूर्यकिरणांमुळे ऊन -सावलीचा खेळ चालला होता. राजवीरने त्या सौंदर्याचे कौतुक केले.

"ह्या ऊन -सावलीचा फार उपयोग होतो. चहाच्या पानांचे तपमान त्यामुळे कायम राहते. 25 ते 35 डिग्री सेल्सियस - चहाच्या झुडपांना जर कडक ऊन लागले तर पानांचे तपमान 40 डिग्रीच्यावर जाऊन पाने करपून काळी पडतात."

"पण काका, झाडांच्या वाढीसाठी सूर्यप्रकाशाची फार गरज असते ना?" राजवीरने विचारले.

"बरोबर आहे. पण जास्त सूर्यप्रकाश हानिकारक असतो. सावलीसाठी झाडे रांगेने उत्तर -दक्षिण लावली जातात. सूर्य पूर्वेला उगवतो तेव्हा पश्चिमेकडील रोपांना सावली मिळते. दुपारी पूर्वेकडील रोपांना सावली मिळते. त्यामुळे त्यांना सारख्या प्रमाणात सूर्यप्रकाश मिळतो. ह्या झाडांमुळे कामगारांनाही चहाच्या मळ्यात काम करताना सावली मिळते."

"मग थंडीत ह्या सावली देणाऱ्या झाडांमुळे उलट रोपांना सूर्यप्रकाश मिळायला अडचण निर्माण नाही का होत?" राजवीरने शंका काढली.



"नाही. तशी अडचण येऊ नये म्हणून सावलीसाठी झाडे लावताना विचारपूर्वक लावली जातात."

"उदाहरणार्थ ही झाडे! हिवाळ्याच्या सुरुवातीला ऑक्टोबर महिन्यात ह्या झाडांची पाने जळतात आणि मार्चमध्ये उन्हाळ्यात झाडांना पुन्हा पालवी येते."

राजवीरचे समाधान काही झालेले नव्हते. कपाळाला छोट्याशा आठ्या पाडत तो म्हणाला, "पण काका, ह्या सावलीसाठी लावलेल्या झाडांमुळे जमिनीची सुपीकताही कमी होत असेल ना? कारण ती केवढी प्रचंड आहेत."

"उलट ही झाडे जमिनीला नत्रवायू पुरवतात. त्यामुळे सुपीकता वाढते. त्यांची पाने जमिनीत पडून कुजतात, त्यांचे खत बनते. जमिनीची सुपीकता वाढते. चहाच्या मळ्यात प्रत्येक गोष्ट उपयोगात कशी आणली जाईल ह्याचा विचार केलेला असतो. मला वाटते आज एवढा अभ्यास पुरे झाला. घरी जाऊन एक कप..."

"चहा घेऊ या!" प्रंजोलने वाक्य पुरे केले आणि वातावरणात हास्याचे फवारे उडाले.

* * *

रात्र गडद होऊ लागली. सारी मुले व्हरांड्यात बसली होती. शेकडो काजवे चमचमत होते. झाडांमधून घुबडाचे ओरडणे अंधार कापत होते. वस्तीवरच्या गाण्याचे सूर वातावरणात ताल घुमवत होते.

अचानक राजवीरला दूर अंतरावर एक प्रकाशाचा झोत विझताना दिसला. तो प्रकाश जवळ येत होता. पुन्हा दूर गेल्यासारखा वाटत होता.

चकित होऊन तो ओरडला, "अरे, ते काय आहे बघा!"

"बाई ग! वेताळाची पालखी आहे का? दिवट्या नाचताहेत बघा. नक्कीच भुते असणार."

"भुते?" पडेल आवाजात राजवीर म्हणाला.

"अरे बापरे. नक्कीच वेताळाची पालखी घेऊन नाचत जाणाऱ्या भुतांच्या दिवट्याचा उजेड दिसतोय बरं का" टिंगल करत प्रंजोल नाटकीपणे म्हणाला.


"काहीतरी बडबडू नका. त्या गोष्टींचे म्हाताऱ्या माणसांत रूपांतर झालेले जलेश्वरी



आजीने स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले आहे. तिनेच मला सांगितले.''

सारेच एकदम स्तब्ध झाले. तेवढ्यात प्रंजोलचे आई -बाबा आले.

''चहाच्या मळ्यातले आयुष्य अगदी शांत असेल. काही खळबळजनक असे कधी घडतच नसेल नाही ?'' राजवीरने शेरा मारला.



श्री. बारूआ म्हणाले, ''का बरे. भीतीदायक प्रसंग घडतातच की. नागासारखे विषारी साप असतात. इंग्रजांनी एकोणिसाव्या शतकात प्रथम आसाममध्ये चहाची जंगली झाडे शोधून काढली आणि लागवड सुरू केली. त्या काळात पटकी, मरी (प्लेग) सारख्या साथीच्या रोगांना त्यांना तोंड द्यावे लागले. शिवाय जंगली जनावरांची भीती असायची. नैसर्गिक आपत्तीही खूप यायच्या. आता परिस्थिती खूप सुधारली आहे. पण खळबळजनक गोष्टी अजूनही घडतात.''

''ती बिबट्याची घटना सांगा ना'' बारूआबाईंनी सुचविले.

''काही वेळा शेजारच्या जंगलातील श्वापदे हिंडत चुकून येतात आणि चहाच्या मळ्यात हलकल्लोळ माजवतात. दोन वर्षांपूर्वी नरभक्षक बनलेल्या एका रॉयल बंगाल वाघाला मी गोळी घातली. रानटी हत्तीसुद्धा काही वेळा मोठा गोंधळ उडवतात.''

''गेल्या पंधरा दिवसांपासून एक बिबट्या इथे दहशत निर्माण करतो आहे. सरदार सावना ठाऊक आहे ? रात्री त्याचा बैल बिबट्याने उचलून नेला.''

''सरदार म्हणजे काय ?'' राजवीरची चौकस बुद्धी त्याला गप्प बसू देई ना.

''चहाचे मळे खूप दूरवर पसरलेले असतात. शिवाय हजारो मजूर त्यात काम करतात. सोयीसाठी मळ्याचे भाग पाडून मजुरांच्या ठराविक गटाकडे दिले जातात. त्यांच्या गटप्रमुखाला सरदार म्हणतात. तो त्या संघाचा संघनायक असतो.''

''बाबा, तुम्ही बिबट्याला पकडण्याचा प्रयत्न केला नाहीत ?'' प्रंजोल.

''हो ! मी तीन रात्री पहारा देत बसलो पण मला तो दिसला नाही. झाडाला बकरे बांधून तो येईल म्हणून वाट पाहिली. पण बकऱ्याच्या वासावरसुद्धा तो आला नाही. भलताच हुशार आहे तो. स्वत:ची काही निशाणी ठेवत नाही. बिचारे मजूर रात्री बाहेर पडायलासुद्धा घाबरतात हल्ली.''

राजवीर ऐकण्यात दंग झाला होता. पण तेवढ्यात जेवणाची वर्दी आली आणि त्याचा नाइलाज झाला. त्याला आणखी ऐकण्याची इच्छा होती.



# IV

दुसऱ्या दिवशी सकाळी सारे न्याहारीला एकत्र आले.

''राजवीर, तुझ्या चहात आणखी दूध हवंय ?'' बारूआबाई म्हणाल्या.

''नको. मला कडक चहा आवडतो काकी.''

''अरे, तुझे काका तर चहात दूधच घालत नाहीत.''

''खरं आहे'' बारूआ म्हणाले. ''व्यक्तिगणिक आणि देशागणिक चहाची चव बदलते. आपण चहा, साखर आणि दूध घालून चहा बनवतो. पण चिनी आणि जपानी कोरा चहाच पितात. ते त्याला 'ग्रीन टी' म्हणतात.''

''म्हणजे ?'' राजवीरने नेहमीप्रमाणे लगेच विचारले.

''तयार चहाचे मुळात तीन प्रकार आहेत. ऑर्थोडॉक्स, सी. टी. सी. आणि ग्रीन टी. वाफेने चहाच्या पानातली फेनक द्रव्य नाहीशी करून मग पाने सुकवतात. त्याला ग्रीन टी म्हणतात. आंबवण्याची क्रिया न झाल्याने पानातली मूळ घटक द्रव्ये तशीच राहतात.

चिनी आणि जपानी लोकही ग्रीन टी उकळून साखर व दूध न घालताच पितात. काही वेळा वासासाठी जाईच्या कळ्या घालतात. जपानी लोकांनी चहा पिण्याची प्रथाच

बनवली आहे. ह्या प्रथेचा त्यांच्या जीवनावर आणि संस्कृतीवर खूप प्रभाव आहे.''

''एक ताबडतोब बनणारा चहासुद्धा असतो ना बाबा ?'' अलका म्हणाली.

''हो. तात्काळ बनणाऱ्या कॉफीसारखा. कपभर गरम पाण्यात फक्त चहाची पुडी बुडवायची. शास्त्रज्ञांनी बाटलीत भरून टिकणारा चहाही शोधला आहे. इतर शीत पेयांसारखाच थोड्याच काळात बाटलीमधून शीत चहासुद्धा मिळू लागेल.''

''आणखी काय बरे शोध लावू शकतील ?'' प्रंजोल विचारात पडला.

''हो, ना'' बारूआ म्हणाले. ''रोज नवे नवे शोध लागताहेत. पण चला हं आता चहाच्या कारखान्यात जायला हवे.''

तेवढ्यात 'बारूआसाहेब'! 'बारूआसाहेब'! असे मोठ्यांदा ओरडत एक माणूस धावत येताना त्यांना दिसला.

''हा बिरची. मंगलचे वडील.'' प्रंजोल राजवीरला म्हणाला.

''साहेब, गुदामात चोरी झाली. चहाची खोकी कुणीतरी नेली.'' धापा टाकत बिरची म्हणाला.

''काय ?'' बारूआ ओरडले. ''किती खोकी होती ?''

''मला माहीत नाही साहेब. माल पाठवण्याचे काम करणारे कारकून डेका बाबू आहेत ना, त्यांनी मला तुम्हांला बोलवायला पाठवले.''

बारूआंनी ताबडतोब पोलीस ठाण्याला फोन करून चोरीची बातमी दिली. मुले आणि ते गुदामाकडे जीपने निघाले.

कारखान्याला तारेचे कुंपण होते. कारखान्यापासून जरा दूर अंतरावर एका कोपऱ्यात गुदाम होते.

गुदामाभोवती गर्दी जमलेली होती. तीन सहायक व्यवस्थापक तिथेच होते. डेका बाबू बारूआंकडे धावले.

''सर, चाळीस खोकी नाहीशी झाली आहेत.'' ते म्हणाले.

''मला तपशील हवा आहे.'' तुटकपणे बारूआ म्हणाले.

''सर, चहाची खोकी आज सकाळी रवाना होणार होती. काल संध्याकाळी गुदामात



जाण्याचे एकमेव प्रवेशद्वार मी स्वतः कुलूप लावून बंद केले. मी आज सकाळी गुदाम उघडले तर ते मोकळे होते. पण कुलूप जसेच्या तसेच होते.''

''किती वजनाची खोकी होती ?''

''प्रत्येकी 50 किलो सर.''

''म्हणजे एकूण 2,000 किलो. तो चहा उच्च प्रतीचा होता. म्हणजे जवळजवळ 50,000 रुपयांचे नुकसान झाले आहे.''

''अंदाजे 50,000 कसे काका ? चहाची किंमत ठराविक नसते का ?'' राजवीरने विचारले.

बारूआंनी घाईने उत्तर दिले. ''हे बघ राजवीर, चहा काही मळ्यांमध्ये विकला जात नाही. गोहत्ती किंवा कलकत्त्याचे दलाल तो लिलावात खरेदी करतात. चहाची चव पाहून चव पारखण्यातले तज्ज्ञ त्याच्या गुणवत्तेविषयी मत देतात आणि त्यावरून चहाची किंमत ठरविली जाते.''

मग अचानक बारूआंनी बिरचीला बोलावले. बिरची कारखान्याचा पहारेकरी होता.

''काल रात्री काही वेगळे पाहिलेस का ?''

''नाही साहेब. गुदामाजवळ एकही माणूस नव्हता.''

''पहाऱ्यावर झोपला नव्हतास ना काल ?''

''नाही साहेब. सावनाने बिबट्या पाहिल्यापासून तर हल्ली मी जास्तच ध्यान ठेवतो.''

ते गुदामात गेले. एका खोलीचेच ते घर होते. जमीन पॉलीश केलेल्या लाकडाची होती. गुदामाला खिडक्या नव्हत्या. हवेसाठी असलेले झरोके गजांनी बंदिस्त होते.

जावक कारकुनाचे टेबल एका कोपऱ्यात होते. त्यावर जमिनीवर लोंबणारा टेबलक्लॉथ होता. बाकी सारे गुदाम मोकळे होते.

राजवीर आणि प्रंजोलने पाहिले, अनेक हेरकथा वाचून मिळवलेले ज्ञान वापरण्याची संधी त्यांच्यासमोर आली होती.

बारूआ इतरांबरोबर चर्चा करत होते. त्या वेळी तो बालचमू काही धागा सापडतो का ते पाहण्यासाठी गुदामात फिरू लागला.

प्रंजोलने गुदामातल्या जमिनीचे सारे कोपरे शोधले. घाईने तो ओरडला, ''राजवीर,



अलका इकडे या !''

जमिनीवर पावलांचे अस्पष्ट ठसे होते.

''अलका, इथे नुकताच कधी पाऊस पडला होता ?''

''जवळ जवळ आठवड्यापूर्वी.''

''आश्चर्य आहे.'' प्रंजोल म्हणाला.



''आठवडाभरात पाऊस पडला नाही. बाहेरचे अंगण दगडासारखे कडक आहे. तरी इथे चिखलाने भरलेल्या पावलांचे ठसे आहेत.''

''हा महत्त्वाचा धागा आहे.'' राजवीरने कबूल केले.

बराच वेळ त्यांनी शोधाशोध केली. काही वेळाने राजवीरला पिवळ्या मातीचा थोडासा चिखल सापडला. तो घेऊन तो बारूआंकडे गेले.

''काका, मळ्यात कुठल्या प्रकारची माती असते ?''

''वाळूदार, चिकण आणि आम्लांश असलेली.'' जरासे गोंधळून बारूआ म्हणाले.



''चिकणमातीमध्ये वाळू आणि माती सारख्या प्रमाणात असते आणि वाळूदार चिकणमातीत
ातीपेक्षा वाळूचे प्रमाण जास्त असते. वाळूतून पाणी न साचता गाळून जाते त्यामुळे
ी माती चहासाठी फार योग्य असते.''

''मग गुदामातल्या जमिनीवर पिवळ्या मातीच्या चिखलाचा गोळा कसा आला ?''

बारूआंनी तो चिखलाचा गोळा काळजीपूर्वक पाहिला. ते ह्या रहस्याचा विचार करत
सतानाच पोलीस आले.

राजवीरकडे तो चिखलाचा गोळा बारूआंनी दिला. आणि पोलिस ठाण्याचे अधिकारी
ोटोकी यांच्याकडे ते वळले. पिवळ्या चिखलाचा तो गोळा राजवीरने काळजीपूर्वक
का कागदात गुंडाळून नीट खिशात ठेवला.

पुढचे दार न उघडता चोरटे गुदामात पोहोचले कसे हे कोटोकींनाही कळेना.

ते बारूआंना म्हणाले, ''मी आधी ह्या गोष्टीचा शोध घेतो.''

तसा श्वास रोखून राजवीर म्हणाला, ''आम्हाला एक धागादोरा सापडला आहे. दाखवू
ा ?''

''बाबा, आम्ही शोध लावण्यात मदत करू का ?'' प्रंजोल.

कोटोकींच्या कपाळाला आठ्या पडल्या. त्रासिकपणे ते म्हणाले,

''बारूआसाहेब, गुन्ह्याचा शोध घेणे हा काही पोरासोरांचा खेळ नाही. कृपा करून
ा मुलांना सांगा की आमच्या कामात ढवळाढवळ करू नका.''

''तुमचे म्हणणे बरोबर आहे साहेब. तुम्ही आज पोहायला जाणार होतात ना ? नाहीतरी
 आज तुम्हांला कारखाना दाखवू शकणारच नाही.

चिडलेली मुले आणि अलका निराश मनाने तिथून बाहेर पडली.





V

काहीच करता येण्याजोगे नव्हते म्हणून ते सारे नदीवर पोहायला गेले. जाताना मंगल भेटला. तोही त्यांच्याबरोबर निघाला. घरी जाताना त्यांनी मिळालेल्या धाग्याविषयी मंगलला सांगितले. बारूआबाईंना त्यांनी बदललेला बेत सांगितला आणि टँफीला घेऊन ते ढेकीयाबारीच्या दक्षिण काठाने वाहणाऱ्या नदीकडे निघाले.

चोरीच्या खळबळजनक बातमीचा कामावर काही परिणाम झाला नव्हता. चहाच्या खुडणीत मजूर मग्न होते.

राजवीर म्हणाला, ''हे तुमचे लोक फार संथपणे काम करतात बुवा. मी त्यांच्या निम्या वेळात दुप्पट पाने खुडेन.''

हे ऐकून मंगलला गंमत वाटली. आपले किडके दात दाखवत तो तोंड भरून हसला.

''हा ! हा ! असे वाटते काय तुला. चल, ती बघ माझी आत्या सुखमणी पाने खुडते आहे. तू पण तिच्याबरोबर काम सुरू कर. पाहू कोण कमी वेळात जास्त पाने तोडते आहे.''

''सुखुफुफु (आत्या) राजवीरला तुझ्याबरोबर पाने खुडायला यायचे आहे. येऊ दे ?''

त्यांनी चहाच्या रोपांच्या रांगांत प्रवेश केला. काम करणारे काही मजूर त्यांना कौतुकाने



हसले.

राजवीरने दोन्ही मुठीत धरून पटकन पाने तोडायला सुरुवात केली.

"छोटे साहेब, अशी नाही तोडायची. हातात येणारे प्रत्येक पान तोडायचे नाही. दुसऱ्या आणि तिसऱ्या पानामध्ये देठ खुडून फक्त कळी व तिच्या बाजूची दोन पाने तोडायची. हे पाहा हे असे... !"

कुशलतेने तिने चट्‌दिशी दोन पाने आणि मधे कळी असलेला देठ खुडून राजवीरच्या हातात दिला. ती पाने कोवळ्या कोंभांची असल्याने नाजूक आणि मुलायम होती. ती कळी खरोखरीची कळी नव्हती. न उघडलेली नवी पाने कळीसारखी दिसत होती.



''प्रत्येक वर्षी पावसाळ्यात नवी पालवी फुटते.'' सुखमणीने सांगितले. ''चहासाठी जुनी पाने न वापरता ही कोवळी पानेच वापरली जातात.''

''खुडताना कळी आणि भोवतीच्या दोनच पानांऐवजी जर जास्त पाने तोडली तर चहा कमी प्रतीचा होईल. म्हणून रोपांची छाटणी करावी लागते.'' मंगलने माहिती दिली. ''छाटणी केली नाही तर चहाचे रोप मोठे होईल. वारंवार खुडणी केल्याने ते छोट्या झुडपाएवढेच राहते. त्यामुळे त्याला जास्त फांद्या फुटतात आणि चहाच्या पानांच्या खुडणीसाठी जास्त जागा निर्माण होतात.''

राजवीर ओशाळून म्हणाला, ''पुढच्या वेळी मी असे ताशेरे मुळीच मारणार नाही.'' आणि ते सगळे पुढे निघाले.

मळ्याच्या शेवटी वळण होते. तिथे चहाची रोपे नव्हती. पाकळीच्या आकाराच्या मोठमोठ्या पानांची झाडे तिथे वाढवली होती.

''ते ग्वाटेमाल आहे'' प्रंजोलने हाताने दाखवले. ''हे जमीन तयार करण्यासाठी वापरतात. रोपवाटिकेत जी चहाची रोपे तुम्ही पाहिलीत त्याची लागवड इथे करतात. ग्वाटेमाल, मिमोसा आणि सिट्रोनेला जमिनीच्या सुपीकतेसाठी आवश्यक असणारे सूक्ष्मजीवाणू बनवितात. त्यामुळे कस कमी झालेली जमीन पुन्हा सुपीक होते.''

''सिट्रोनेला म्हणजे ज्यापासून तेल काढतात ते गवत तर नव्हे ?''

''हो, सिट्रोनेलाला लिंबासारखा सुरेख वास येतो. त्याचा उपयोग साबण आणि सुगंधी द्रव्ये बनविण्यासाठी होतो.

''बऱ्याच बागांमधून व्यवसाय म्हणून हल्ली त्याची लागवड करतात.''

थोडक्या वेळात ते चहाच्या कुंपणापाशी आले. लोखंडी फाटकावर चढून दलदलीचा तुकडा ओलांडून ते नदीपाशी आले.

बाजूच्या प्रदेशाचा पुरापासून बचाव करण्यासाठी नदीच्या काठालगत उंच बंधारा बांधलेला होता. मुले धडपडत कशीबशी त्याच्यावर चढली. वर चढल्यावर आश्चर्यचकित होऊन राजवीर खाली वाकला आणि जमिनीचे निरीक्षण करू लागला.

गुदामातून आणलेल्या चिखलाची पुरचुंडी त्याने खिशातून बाहेर काढली. नदीकाठची





आणि ती माती सारखीच होती, ह्यात शंकाच नव्हती.

"चोरटे इथे आले होते." प्रंजोल उत्साहाने ओरडला.

"इथली माती कोरडी आहे. ती ओली झाल्याशिवाय त्यांच्या बुटांना चिकटणे शक्य नाही."

"ह्याचा अर्थ एकच आहे. ते नदीच्या पाण्यातून आले असले पाहिजेत."

"नव्या धाम्याची मुलांनी मनात नोंद केली आणि पुढच्या तपासासाठी ते पांगले. अलका आणि टॅफी कुत्रा पाण्याकाठच्या खडकांवरच रेंगाळले.

अचानक एका छोट्या खडकाला ठेचकाळून अलकाचा तोल गेला. खडकावरून पाण्यात घसरत पडताना ती मोठ्यांदा किंचाळली. घसरतीच्या टोकावर हाताशी आलेले एक झुडूप तिने कसेबसे पकडून ठेवले आणि ती पाण्यावर लोंबकळू लागली.

"घाबरू नकोस अलका! आम्ही येतोय." प्रंजोल ओरडला. पण ते पोहोचायच्या आतच अलकाचा भार न झेपून ते झुडूप तुटले आणि अलका थेट नदीच्या थंडगार पाण्यात धाडदिशी पडली. खूप पाणी उडेल म्हणून डोळे विस्फारून गोंधळून मुलें पाहत राहिली. थोड्याच क्षणात घाबरलेली अलका काही इजा न होता पाण्यात चक्क उभी असलेली त्यांना दिसली. त्यांचा स्वत:चा डोळ्यांवर विश्वासच बसेना. ती गुडघ्यांपर्यंत पाणवनस्पतीत बुडली होती. त्यामुळे ती पाण्यावर उभी असलेलीच दिसत होती. हा काय प्रकार आहे ते त्यांना कळेना.

सारे तिच्याकडे धावले. जवळ गेल्यावर त्यांना अलकाच्या पाण्यावर उभे रहाण्याच्या रहस्याचा उलगडा झाला. तिथे एक लाकडी नाव झुडपांनी व्यवस्थित लपवून ठेवली होती. नाव किनाऱ्याला बांधलेली होत्ती. अलका अलगदपणे त्या नावेतच पडली होती.

"नशीबच म्हणायचे."

"काय घाबरवलेस तू आम्हांला."

"मला हे संशयास्पद वाटते आहे." मंगल म्हणाला.

"का? नाव किनाऱ्यावर बांधलीय त्यात विशेष काय? अशा कितीतरी नावा ह्या किनाऱ्यावर बांधलेल्या असतील."





''खरे आहे; पण ही नाव जशी लपवली आहे तशा त्या लपवलेल्या नसतील.''

''हं, आता माझ्या ध्यानात यायला लागले आहे. आपण इथून लवकर जाणे उत्तम.''

घाईने नाव होती तशी झाकून ते घरी निघाले. घराजवळ आल्यावर त्यांच्या लक्षात आले की काहीतरी महत्त्वाचे घडलेले आहे.

काम सोडून चहाच्या मळ्यातले सारे मजूर घोळक्याने उभे होते. हातवारे करून जोरजोराने बोलत होते.

सुखमणी धावत मंगलजवळ आली. ती फार अस्वस्थ होती.

''मंगल पोलिसांनी तुझ्या वडिलांना आणि डेकाबाबूंना पकडले आहे. त्यांना वाटते आहे की त्या दोघांनीच चहाच्या पेट्या चोरल्या आहेत.''

मंगल थक्कच झाला. त्याचे टपोरे डोळे भरून आले. त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याला बाजूला घेऊन प्रंजोल हलक्या आवाजात म्हणाला

''आमच्या बंगल्यामागच्या हत्यारे ठेवण्याच्या खोलीपाशी तीन वाजता ये. आपण लढा देऊ या. त्याची बैठक ठीक तीन वाजता.''





## VI

दुपारी जेवताना बारूआ म्हणाले, ''माझी खात्री आहे की बिरची आणि डेकाबाबू निरपराध आहेत. दोघे ह्या मळ्यात गेली वीस वर्षे काम करताहेत.''

''मग पोलिसांनी त्यांना का पकडले ?'' प्रंजोलने विचारले.

''पोलीस अधिकाऱ्याचे म्हणणे असे की ज्या अर्थी दार उघडल्याशिवाय कुणी गुदामात प्रवेशच करू शकत नाही त्या अर्थी दार उघडून पेट्या बाहेर काढून ते पुन्हा बंद केले गेले असावे. दाराची किल्ली डेकाबाबूंकडे असते आणि बिरची चौकीदार आहे.''

प्रंजोल बोलणार एवढ्यात राजवीरने त्याला खुणेने गप्प केले.

दुपारी मुले बंगल्यामागच्या अंगणात हत्यारे ठेवण्याच्या खोलीत जमली. मंगल खिन्न होता.

''वस्तुस्थितीचा विचार करून आपण काहीतरी निर्णय घेऊ या.'' राजवीर आग्रही आवाजात म्हणाला.

''डेका निर्दोष आहे असे धरू या.'' प्रंजोल म्हणाला. चोरांनी तशाच दुसऱ्या किल्लीने कुलूप उघडले असावे.''

''पण मग माझ्या वडिलांनी त्यांना पाहिलेच असते आणि धोक्याचा इशारा दिला

असता.'' मंगल म्हणाला.

''ह्याचा अर्थच असा की चोर पुढच्या दाराने आलेले नसणार.'' प्रंजोल ठामपणे म्हणाला. इतरांनाही ते पटले.

''मग आत शिरायला छपरातून येणे किंवा भिंत फोडून येणे ह्याशिवाय दुसरा मार्गच कुठे आहे. ते तर त्यांनी केलेले दिसत नाही.'' अलका म्हणाली.

राजवीर विचार करून डोळे बारीक करत म्हणाला, ''एक मार्ग आहे. जमिनीखालून भुयाराने फक्त ते थेट गुदामात शिरू शकतात.''

''हो रे हो.'' आनंदाने प्रंजोल ओरडलाच. ''ते पायांचे ठसे आठवतात का? अनेक आठवडे पाऊस नसताना ते ठसे ओले आणि चिखलाचे होते.''

मंगलला ते पटले.

''भुयारातली माती नक्कीच ओली आणि चिखलाची असणार आणि बाबांना ते का दिसले नाहीत हा प्रश्नही त्यामुळे सुटतो.''

''गुदामात आपण शोध घेत होतो तेव्हा भुयारी मार्गाची काहीच खूण आपल्याला आढळली नाही.'' अलकाने शंका काढली.

''त्या वेळी आपल्याला भुयाराची कल्पनाच कुठे होती. आता त्या दृष्टीने शोध घेता येईल. मंगल, आपल्याला आता गुदामात जाता येईल का?''

''हो. दरवाजा उघडाच आहे. गुदाम मोकळे झाल्याने कुणीच कुलूप लावलेले नाही.''

थोड्याच वेळात ते गुदामापाशी पोहोचले. त्याचे दार उघडे पाहून त्यांनी समाधानाचा नि:श्वास सोडला.

नीट तपासणी करता करता राजवीरचा चेहरा आनंदाने फुलला.

''मित्रा प्रंजोल, अरे ह्या टेबलाखाली पहा.'' तो उत्साहाने म्हणाला.

टेबल बाजूला केल्यावर त्यांना एक पातळ रेषा असलेला चौकोन दिसला. चटकन पाहणाऱ्याला तो दिसूही शकला नसता.

मंगलने छोटा चाकू काढून त्याचे पाते त्या पातळ रेषेत खुपसले. आणि बोटे घालायला जागा होईल एवढे त्या लाकडी जमिनीत टोकरले. चौकोनाच्या टोकावर हाताची पकड



घट्ट करून त्याने जोराने ओढले तसा सारा चौकोन बाहेर आला.

''अय्या'', उत्साहाने अलका किंचाळली. चौकोनाखाली काळाकुट्ट अंधार असलेल्या भुयाराचे तोंड दिसू लागले होते.

''ह्या लाकडी फळ्यांचा चोरांनी गुप्त दरवाजासारखा उपयोग केला. त्यांनी वर येताना हा दरवाजा ढकलला असणार. चहाच्या पेट्या इथून पाठवल्यावर गुप्त दरवाजा झाकण्यासाठी त्यांनी टेबल पुन्हा त्यावर ठेवले. शेवटी जो चोर गेला त्याने आत उतरल्यावर फळी बंद करून घेतली.'' मंगलने त्या भुयाराचा दरवाजा पुन्हा जागेवर ठेवला.


''असे आहे एकूण.'' तो म्हणाला.

''आता आपल्याला इथे सापडलेला चिखल आणि लपवलेली नाव यांचा उलगडा होतो.'' राजवीर सांगू लागला. ''चोरांनी गुदामापर्यंत भुयार खणले आणि चहाच्या पेट्या नदी किनाऱ्यापर्यंत नेल्या.

पलीकडच्या किनाऱ्यावर चहाच्या पेट्या नेण्यासाठी त्यांनी नावेचा उपयोग केला. त्या किनाऱ्यावरून पेट्या नेण्यासाठी नक्कीच त्यांचा ट्रक उभा असणार.''

''ह्या भुयाराचे दुसरे टोक शोधून काढायला हवे.'' मंगल म्हणाला.

''आपण भुयारातून जायला काय हरकत आहे?'' राजवीरने विचारले.



मंगल सावधपणे म्हणाला, ''त्यामुळे कदाचित आपण थेट चोरांच्याच तावडीत सापडू. ते शहाणपणाचे होणार नाही.''

''आणखी कुठल्या पद्धतीने आपल्याला चोरांना शोधून काढता येईल ?''

मालाच्या जावक टेबलावरचा एक कागदाचा तुकडा आणि पेन्सिल प्रंजोलने उचलली. कागदावर एक कच्चे चित्र काढून तो म्हणाला, ''चोरांनी हे भुयार नक्कीच दक्षिणेकडे नदीच्या दिशेने खोदले असणार. भुयाराची लांबी फार नसणार. जास्तीत जास्त शंभर मीटर. आपण गुदामापासून बोटीपर्यंत एक सरळ रेघ मारली आणि गुदामापासून पन्नास ते शंभर मीटरपर्यंतचा परिसर धुंडाळला तर भुयाराचे दुसरे टोक आपल्याला सापडेलही कदाचित.''

गुदामातून बाहेर पडून ठरलेल्या दिशेने ते सावधपणे निघाले. कामाची वेळ संपून गेली होती. चहाच्या मळ्यात कुणीही मजूर नव्हता. सहज फिरायला निघाल्यासारखे ते निघाले; पण त्यांची नजर सावध होती. आणि मंगलला अचानक भुयार दिसले.

भुयाराचे ते दुसरे टोक एका खड्ड्याच्या वरच्या बाजूला होते. चिखल लावलेल्या बांबूच्या एका चौकटीने ते बंद केलेले होते. छोटी झुडपे त्या चौकटीत बसवल्याने भुयाराचे तोंड बेमालूमपणे बंद झाले होते.

मंगलने खड्ड्यात उडी मारली. बांबूची चौकट ओढून आत खात्री करून घेतली. चौकट बंद करून मान हलवून त्याने भुयार असल्याचे साऱ्यांना खुणावले.

''कुणी पाहायच्या आत इथून दूर जाऊ या.'' तो घाईने म्हणाला. अर्धवट धावत, ते हत्यारांच्या खोलीत परतले.

''बाबांना हे ताबडतोब सांगू या. ते पोलिसांना सांगतील आणि मंगलच्या वडिलांची आणि डेका बाबूंची सुटका करतील.'' प्रंजोल कुजबुजल्या आवाजात म्हणाला.

''एवढ्यात नको'' बसक्या आवाजात राजवीर म्हणाला. ''आपण अगदी सुरक्षित आहोत ह्या कल्पनेतच चोरांना राहू दे.''

''बरोबर आहे.'' मंगल शांत आवाजात म्हणाला. ''आपण आणखी पुरावा गोळा करायला हवा.''





''पण सुरुवात कशी करायची.'' प्रंजोलने विचारले.

''चोरलेला चहा उत्तम प्रतीचा होता हे चोरांना कसे कळले बरे?'' मंगल चतुरपणे म्हणाला.

''तुला काय म्हणायचे आहे?''

''हेच की चोरांचे मळ्यात काम करणाऱ्या मजुरांशी लागेबांधे असणार.''

''भुयार खोदायलाही खूप वेळ लागतो.'' अलकाने मुद्दा मांडला. ''शिवाय खोदताना निघालेली मातीही कुठेतरी टाकली असणार. इतके सारे घडत असताना कुणाच्याच कसे लक्षात आले नाही ही आश्चर्याची गोष्ट आहे.''

''नक्कीच. त्यांनी हे काम फक्त रात्रीच केले असणार.'' बोलताना राजवीरचे डोळे चमकले.

एवढ्यात मंगलच्या डोक्यात कल्पना चमकली. ''अरे नक्की हे काम त्याचेच.'' सारे हळू बोलण्यासाठी खुणावत असतानाही न राहवून तो ओरडला.

''नक्कीच सरदार सावनाचा हात आहे ह्या चोरीत.''

''कोण रे? ज्याचा बैल बिबट्याने नेला तो?'' प्रंजोलने विचारले.

''म्हणजे तुलाही ती गोष्ट माहीत आहे. बिबट्याची गोष्ट पसरवून सावनांनेच साऱ्या मजुरांत भीती पसरवली. रात्री कुणी बाहेर पडेना. खरेतर त्या बिबट्याला कुणीही प्रत्यक्ष पाहिलेले नाही.''

''हो. बाबाही हेच म्हणाले. त्याचे ठसेसुद्धा कधी दिसलेले नाहीत.''

''सावनाने मुद्दामच ही अफवा पसरवली. त्यामुळे चोरांना रात्री काम करणे सुलभ झाले.''

सारेच विचारमग्न होऊन गप्प उभे राहिले.

''सावना कारखान्यात माल बांधणी विभागात काम करतो. त्यामुळे कुठल्या प्रतीचा चहा पेट्यांत भरला जातो आहे ते त्याला माहीत होते.'' आपल्या विधानाला पुष्टी देण्यासाठी ठाम आवाजात मंगल म्हणाला.



## VII

दुसऱ्या दिवशी सकाळी बारूआंनी राजवीर आणि इतरांना कारखान्यात नेले.

जीपमधून जात असताना राजवीर म्हणाला,

''चमत्कारच आहे. ह्या हिरव्यागार पानांचीच गडद तपकिरी रंगाची पत्ती बनते.''

''पानांचा ओलावा पूर्णपणे काढून घेतला जातो. त्याचा रंग, वासही जातो. कुठलीही रसायने वापरली जात नाहीत. ही क्रिया जलद होण्यासाठी यंत्रांचा वापर केला जातो. त्यामुळे प्रत चांगली राहते आणि माल जास्त निघतो. तुम्ही घरीसुद्धा चहाची पत्ती बनवू शकता.''

''घरी? ती कशी?'' उत्सुकतेने राजवीरने विचारले.

''पूर्वीच्या काळी ज्या पद्धतीने बनवायचे तशी. अर्थात ही पद्धत गावठीच बरे का.''

''काका, हे सगळे ग्रीन टी बद्दल झाले. पण इतरही दोन जाती सांगितल्यात. सी.टी.सी आणि ऑर्थोडॉक्स. ते बनवण्याची पद्धत वेगळी असते?''

''अर्थात सी.टी.सी.ला जास्त चांगला वास असतो. सी.टी.सी चा कमी पत्तीत जास्त चहा बनतो. ऑर्थोडॉक्स पत्ती बनवताना उकळली जाते तर सी.टी.सी पत्ती गाळली जाते. त्याच्या बनवण्याच्या पद्धतीतला फरक मी तुम्हांला कारखान्यातच दाखवेन.''

कारखान्याच्या फाटकापाशी दरवानाने त्यांना कडक सलाम केला. भिंती नसलेल्या लांबलचक छपराच्या बांधकामापाशी बारूआ थांबले. त्याच्या आत ओळीने अर्धा डझन फलाट बांधलेले होते.

"ह्यांना चँम्ज म्हणतात. तोडलेल्या हिरव्या पानांचे इथे वजन करतात आणि ह्या 'चँम्ज' वर सुकवण्यासाठी पसरतात. काही तासांतच पाने सुकू लागतात. त्यांच्यातला ओलावा 30 ते 40 टक्क्यांनी कमी होतो. ह्याला नैसर्गिक सुकवणे म्हणतात."

जवळच सारखेच दिसणारे बांधकाम होते. पण जाडेभरडे कापड पसरलेल्या फलाटांऐवजी त्यात सिमेंटच्या लांबट टाक्या होत्या आणि जाड तारेची जाळी पसरली होती. जाळीवर पाने पसरली होती. प्रत्येक टाकीच्या शेवटी जास्त क्षमतेचे विजेचे पंखे होते.

"ह्याला नियंत्रित सुकवणे म्हणतात." बारूआंनी सांगितले, "दमट हवेत नैसर्गिक सुकवण्याच्या क्रियेला फार वेळ लागतो. म्हणून नियंत्रित तपमानाची गरम हवा हौदातून सोडली जाते."

मुले बारूआंबरोबर कारखान्यातून हिंडत होती. यंत्रांचा क्लीक आवाज वातावरणात भरून राहिला होता. त्यामुळे एकमेकांशी त्यांना ओरडूनच बोलावे लागत होते. चहाचा उग्र वास नाकात घुसत होता.

तीन पायाच्या एका यंत्राकडे बोट दाखवून बारूआ म्हणाले, "हे लाटण -मेज आहे. चहाची सुकलेली पाने चुरली आणि वळवली जातात. त्यामुळे पानातून पिळला गेलेला रस सगळीकडे सारखा पसरतो. वळवलेली पाने गाळण्यासाठी गोल फिरणाऱ्या जाळीदार नळीतून ती पुढे जातात आणि ही लहान चाळणी." बारूआ पुढे म्हणाले, "चांगली वळलेली पाने यातून गाळली जातात. ह्या पायरीला सी.टी.सी आणि ऑर्थोडॉक्सची पद्धती वेगवेगळी होते. ऑर्थोडॉक्स चहासाठी गाळलेली पाने सरळ कसकसण्याच्या अथवा आंबवण्याच्या क्रियेसाठी जातात. मात्र सी.टी.सी ची पाने आधी दुसऱ्या एका यंत्रात टाकली जातात."


"काका, सी.टी.सी म्हणजे नेमके काय ?"

"गुंडाळणे (कर्लींग) तोडणे (टेअरिंग) आणि चुरणे (क्रशिंग) ह्या शब्दांची ती आद्याक्षरे



आहेत. सी.टी.सी यंत्र हेच काम करते. बारीक तुकडे झालेला लगदा यंत्राच्या तोंडातून बाहेर येऊन अल्युमिनियम ट्रेच्या ढिगाऱ्यात पडतो."

"तुम्ही पाहिले असेल सी.टी.सी त चहाची पाने अगदी बारीक करतात. त्यातला रस पिळला जातो आणि सारख्या प्रमाणात मिसळला जातो. ऑर्थोडॉक्समध्ये पाने कापली जात नाहीत. रसही न पिळता हळूहळू काढला जातो. त्यामुळे चहाचा गंध कायम राहतो."



ते आंबवण्याची क्रिया घडणाऱ्या खोलीत गेले. तिथे चहाची पाने हौदांमधून पसरलेली होती. नैसर्गिकरीत्या आंबवण्याची क्रिया होत होती. डोळ्यासमोरच पानांचा हिरवा रंग हळूहळू तपकिरी झालेला पाहून राजवीर थक्क झाला.

"ही क्रिया पूर्ण होण्यासाठी एक तास लागतो." बारूआ एखाद्या उत्तम मार्गदर्शकाप्रमाणे समजावून सांगत होते. "पानातले हिरवे द्रव्य भस्मिकरणाच्या क्रियेने नाहीसे होते. वातावरणातल्या प्राणवायूचा पानातल्या रसायनांशी संयोग घडतो. त्यामुळे पानांचा वास आणि रंग बदलतो."

नंतर ते सुकवण्याच्या खोलीत गेले. त्यात सुकविण्याचे मोठे यंत्र होते. आंबवलेल्या पानांतून कोळशाच्या किंवा तेलभट्टीच्या मदतीने गरम हवा सोडली जात होती.

गरम हवेमुळे पानातला शिल्लक असलेला ओलावा निघून जात होता. त्यामुळे पाने सुकी आणि कडक होत होती. "वास घेऊन पाहा बरे." असे म्हणत बारूआंनी मूठभर चहा उचलून राजवीरला दिला. चहाची पत्ती उबदार होती आणि तिला सुरेख गंध होता.

"ह्यानंतर ऑरेंज पिको, पिकोफॅनिंग, तुकडा ऑरेंज पिको असा वेगवेगळ्या प्रतीनुसार चहा विभागला जातो. ही विभागणी निमुळत्या तोंडाच्या नरसाळ्याच्या आकाराच्या यंत्रात जाळीमधून केली जाते. वेगवेगळ्या आकाराची जाळी ह्या विभागासाठी वापरली जाते."

शेवटी ते चहाची खोकी भरली जात होती तिथे आले. देवीचे वण असलेला एक काळा कुरूप माणूस थरथरणाऱ्या यंत्रावर ठेवलेल्या लाकडी पेटीत फावड्याने चहा भरत होता. मंगलने केलेल्या वर्णनावरून मुलांनी त्याला ओळखले. तो सावना होता. उत्कृष्ट प्रतीचा चहा खोक्यात भरला जातो आहे हे सरदारशिवाय अधिक चांगल्या प्रकारे दुसरे कोण ओळखणार ?

"ओलावा हा चहाच्या पत्तीचा सर्वांत मोठा शत्रू आहे." बारूआ पुढे सांगू लागले. मुलांचे लक्ष आता दुसरीकडे वेधले आहे हे त्यांच्या लक्षातच आले नव्हते. "हे कायम थरथरणारे यंत्र पेटीत चहा भरताना हवा साठायला थोडीशीही जागा उरणार नाही ह्याची काळजी घेते. चहाच्या खोक्यांना आतून अल्युमिनियमची पातळ चांदी लावतात. त्यामुळे पेटीत बाहेरचा ओलावा झिरपू शकत नाही."




पेटीत चहाची पत्ती भरून कामगाराने वरून झाकण लावले आणि भोवतीने खिळे ठोकून ते घट्ट बसवले. मग पेटीवर चहाची प्रत, दर्जा आणि मळ्याचे नाव यांचे ठसे उमटवले जातात.

"दर्जा उत्तम राखण्यासाठी रोज तयार पत्तीमधून थोडीशी पत्ती काढून त्याची परीक्षा केली जाते." बारूआ अभिमानाने म्हणाले, "चहाच्या एका घोटात मी सांगू शकतो की ती चहाची पत्ती चांगली आहे का जास्त आंबवली गेली आहे किंवा तिला जरूरीपेक्षा जास्त उष्णता दिली गेली आहे."

इतका वेळ यंत्रांच्या गडगडाटाची सवय झाली होती. त्यामुळे बाहेर शांत वातावरणात त्यांना फारच विचित्र वाटले.

ते कारखान्यातून निघाले त्याच वेळी सकाळच्या सुट्टीचे भोंगे कर्कशपणे वाजले.



## VIII

दुपारी चार वाजता मळ्यातील मजुरांचे काम संपायचे. पाच वाजता मंगलला बरोबर घेऊन ते सारे मजुरांच्या वस्तीवर गेले.

छोटी कुंपणे असलेल्या झोपडीवजा घरांची रांग त्यांना दिसली. घरे गवताने शाकारली होती. मधेमधे सार्वजनिक विहिरी होत्या. तिथे बायका गप्पा मारत कपडे धूत होत्या. त्यांची छोटी पोरे आजूबाजूला हुंदडत होती. गावठी कुत्री धूळभरल्या रस्त्यांवरून हिंडत होती. चिखलांच्या छोट्या छोट्या डबक्यात डुकरे आनंदाने लोळत होती.

मैदानात काही तरुण मजूर फुटबॉल खेळत होते. त्याच घरांमधून रेडिओवरून चाललेले संगीत ऐकू येत होते.

मंगल त्यांना म्हणाला, "आम्हांला नृत्य आणि संगीत आवडते. जेव्हा संधी मिळते तेव्हा आम्ही आनंदोत्सव साजरा करतो."

एका घरात खूप हालचाल जाणवली तसे ते सारे थांबले. रंगीत कागदी फुलांनी घराचे दार सजवलेले होते. अर्धगोल करून बसलेली पुरुष, बायका, पोरे गाणी गात होती. पाच -सहा बायका हातात हात धरून फेर नाचत होत्या.

"त्या झुमूर नाच करताहेत!" मंगल म्हणाला.



"आमच्या बऱ्याच सणांत झुमूर गाऊन नाचले जाते. तुशुपूजा, करायपूजा हे आमचे सण आहेत. पण आम्ही आसामी बिहू, कालीपूजा आणि होळीचे सणही साजरे करतो."

"ते आता नृत्य का करताहेत?" राजवीरने विचारले.

"कुणाचा तरी आठवड्याने विवाह आहे. तो साजरा करायला आत्तापासून सुरुवात झाली आहे."

सावनाचे घर वस्तीच्या शेवटी होते. आधी ठरल्याप्रमाणे मंगल जरा लांबच रेंगाळला. प्रंजोल, राजवीर आणि अलका त्याच्या घरात शिरले.

सावनाने त्यांचे स्वागत केले. ते सारे बसले.

"बिबट्याने तुझ्या बैलाला नेले ती हकीगत आम्हांला ऐकायची आहे," प्रंजोल म्हणाला.

सावना जरा अस्वस्थ झाला. कपाळाला आठ्या घालून डोळे बारीक करून तो आठवायचा प्रयत्न करू लागला.

"मला वाटते त्या गोष्टीला पंधरा दिवस झाले. अंधारी पावसाळी रात्र होती. मध्यरात्री मला गोठ्यामधून हंबरणे ऐकू आले. ते हंबरणे मला नेहमीसारखे वाटले नाही. मी माझा डाव (मोठ्या पात्याचा चाकू) घेऊन गोठ्याकडे धावलो आणि मला काय दिसले ठाऊक आहे? भला थोरला बिबट्या आपल्या सुळ्यांमध्ये माझ्या बैलाची मान धरून तो त्याला फरफटत नेत होता."

"तुझ्या हातात कंदिल होता?" राजवीरने विचारले.

"नाही. घरातली रॉकेलची चिमणी त्या हवेत विझून गेली असती."

"तुझी खात्री आहे तो बिबट्याच होता? तो वाघ (रॉयल बेंगॉल टायगर) सुद्धा असू शकेल."

"नाही. बिबट्याच होता. त्याच्या अंगावरचे ठिपके मला नीट दिसले."

"तू काय केलेस त्याला पाहिल्यावर?"

"काय करणार. तरस वगैरे असते तर त्याला हाकलले असते. पण वाघाच्या बाबत असे धाडस मी कसे करणार छोटेसाहेब? म्हणून मी आरडाओरड करायला, डबा बडवून आवाज करायला सुरुवात केली."



“तुला बैलाचा सांगाडा मिळाला का नंतर ?”

“नाही. मी प्रयत्नही केला नाही. बैल तर मरून गेला होता. सांगाडा शोधून उपयोग काय होता ?”

“तू त्याचे ठसे नीट पाहिलेस का ?”

“नाही. ठसे नव्हतेच. पावसामुळे ते पुसून गेले होते.”

“अरेरे मला वाटले तू बिबट्याशी झुंज घेतलीस, असे काहीतरी चित्तथरारक ऐकायला मिळेल असे वाटले; पण तू त्याला आवाज करून पळवूनच लावलेस.”

“असो. बरंय ! निघतो आम्ही.”

प्रंजोलकडे पाहत सावनाने विचारले, “कारखान्यातल्या चोरीचे काही कळले का तुमच्या वडिलांना ?”

“हो !” निर्विकारपणे प्रंजोल म्हणाला, “आज सकाळीच पोलिसांचा फोन आला होता. बिरची आणि डेकाबाबूंनी चोरी कबूल केली आहे.”

सावनाला भयंकर आश्चर्य वाटले. “चोरी कबूल केली ?”

“हो. पोलिसांनी चोरीचा तपास बंद करून केस बंद केली. चोरी सापडल्याने माझे वडील उद्यापासून पुन्हा गुदामातले कामही सुरू करणार आहेत. कारखान्यात चहाची खूप खोकी साठली आहेत ना. ती सगळी आता गुदामात नेतील.”

ते सावनाच्या घरातून बाहेर पडले. तेव्हा सावनाच्या चेहऱ्यावर खुशीचे हास्य चमकत होते. मंगल थोड्या वेळात त्यांना येऊन मिळाला. “काय घडले ?”

“तो नक्कीच बंडला मारतोय. अंधारी पावसाळी रात्र. त्याच्या हातात दिवा नव्हता. पावलांचे ठसेही पावसाने वाहून गेलेले, असे असताना आलेले जनावर बिबट्याच होता असे तो ठामपणे सांगतो. स्वत: त्याच्या अंगावरचे ठिपके पाहिल्याचे सांगतो.”

“आम्ही त्याच्या गोठ्याकडे जाऊन आलो. घराभोवतालचे कुंपण खूप जुने झाले आहे. तरी ते कुठेच मोडलेले नव्हते. भल्यामोठ्या बैलाला बिबट्या कुंपणावरून नेताना ते न मोडता नेणे अशक्य आहे. खरंच जर बिबट्या आलेला असता तर कुंपण नक्कीच मोडलेले दिसले असते.”



“हो ना आणि बैल गेल्याचे काहीही दु:ख त्याच्या चेहऱ्यावर नव्हते. एका गरीब मजुराला बैल जाणे म्हणजे केवढा मोठा तोटा आहे.” अलका म्हणाली.

“मला हे वाटतच होते. सावनावर पाळत ठेवायला हवी.” मंगल गंभीरपणे म्हणाला.

“आम्ही तेच ठरवले आहे.” प्रंजोल म्हणाला. “आम्ही त्याला एक खोटी बातमी दिली आहे. त्यावर तो काय करतो ते आज रात्री गुपचूप जाऊन पाहायचे.”



## IX

रात्री अकरा वाजता प्रंजोल आणि राजवीर चवड्यावर चालत गुपचूपपणे जिना उतरले. बंगल्यातून ते हत्यारांच्या खोलीकडे गेले. टॅफी कुत्राही त्यांच्याबरोबर निघाला. खुणेसाठी प्रंजोलने दोनदा टॉर्चचा प्रकाश पाडला. तसा घाईने मंगल म्हणाला, ''लवकर चला. अजिबात वेळ घालवू नका.''

त्या काळ्याकुट्ट अंधारातून ते तिघे घाईने निघाले. आकाश काळ्या ढगांनी भरून गेले होते. मध्येच दूरवर विजा चमकत होत्या. येणाऱ्या वादळाचीच ती सूचना होती.


रात्री मळ्यातले सारे रस्ते सारखेच दिसत होते. मंगल नसता तर त्यांना रस्ता सापडणे कठीण होते. न चुकता मंगलने त्यांना वस्तीवर सावनाच्या घरापाशी नेले.

सारी घरे अंधारात बुडून गेली होती. फक्त सावनाच्या घरात क्षीण दिवा जळत होता. आवाज न करता मुले त्याच्या घराजवळ गेली. बांबूची चौकट असलेल्या छोट्या खिडकीतून त्यांनी आत पाहिले.

सावना कुठेतरी जाण्याची तयारी करत होता. त्याने हातात मोठ्या पात्याचा चाकू, त्याचा 'डाव' घेतला. फुंकरीने दिवा घालवून अलगदपणे दार उघडून तो बाहेर पडला.

मुले अंधारात लपली. सावना थांबला. आजूबाजूला सावधपणे पाहून कुणी पाहत





नाही ह्याची खात्री करून मग तो झपाट्याने पुढे निघाला.

मुले बरेचसे अंतर ठेवून त्याच्या मागून निघाली.

चालताना राजवीर एकदम भयंकर दचकला. काही कल्पना येण्याआधीच जोराचे ओरडणे वातावरणात घुसले होते.

''कसला आवाज रे'' राजवीर कापऱ्या आवाजात म्हणाला.

''कोल्हयाचा'' मंगल कुजबुजला. ''एकजण ओरडला की त्यांचा अख्खा कळप ओरडायला लागतो.''

प्रंजोलच्या पोटात गोळाच उठला. मिट्ट अंधार, भयाण वातावरण, बांबूच्या बेटातून शीळ घालणारा वारा, कोल्हेकुई साऱ्यांमुळे त्याला विलक्षण दडपण आले. खरंच, आत्ता बिबट्या आला तर ? त्याच्या मनात शंकेची पाल चुकचुकली.

सावना मळ्यातून राष्ट्रीय महामार्गावर गेला. महामार्गावर छोटा बाजार होता. तो रविवारी भरे. दुकानांची तिथे एक लांब रांग होती. त्याच्याच मागच्या भागात व्यापारी रहायचे. सावना त्यांतल्या एका दुकानवजा घरापाशी गेला. त्याने दारावर टकटक केली.

दार किलकिले होऊन सावधपणे उघडले गेले. सावना आत गेला तसे ते लगेच बंद केले गेले.

ते घर शेजारच्या घरापासून निमुळत्या आणि दुर्गंध येणाऱ्या गटाराने विभागले होते. नाके मुरडत मुलांनी गटार ओलांडले. एका रांगेने श्वास रोखून मांजराच्या पावलांनी ते अर्धवट उघड्या खिडकीजवळ गेले. मंगल सावधपणे आत डोकावला. नंतर राजवीर आणि प्रंजोलनेही पाळीपाळीने आत पाहिले.

पाच माणसे एका पलंगावर मांड्या घालून पत्ते खेळत बसली होती. सावना एका लाकडी स्टुलावर बसला होता.

त्या पाची जणांचे चेहरे दुर्मुखलेले उग्र होते. त्यांच्यातल्या मुख्य वाटणाऱ्या एका धिप्पाड दांडगट माणसाशी बोलू लागला.

''डेका आणि बिरची ह्यांनी गुन्हा कबूल केला आहे. का केला देव जाणे. पण त्यामुळे आता किनाऱ्यावरचा धोका संपला.'' सावना त्याला सांगत होता.



''साधी गोष्ट आहे. पोलिसांना घाबरून त्यांनी गुन्हा कबूल केला असावा. न्यायालयात ते आपले म्हणणे फिरवतील.''

''व्यवस्थापक उद्यापासून पुन्हा गुदामात काम सुरू करणार आहेत. कारण कारखान्यात चहाच्या भरलेल्या खूप पेट्या साठल्या आहेत.''



''पोलिसांनी चुकीच्या माणसांना पकडले आहे ह्याची त्यांना कल्पना नाही.''
''कुठल्या प्रतीच्या चहाच्या पेट्या आहेत त्या ?'' प्रमुखाने विचारले.
''उत्तम प्रतीच्या. बाजारात खूप किंमत येईल त्याला.''
प्रमुखाचा चेहरा फुलला. ''मग उद्या दुसरा छापा घालूयाच.''
सगळ्यांना आश्चर्य वाटले. बाकीच्यांनी कसून विरोध केला.
''उगीच विषाची परीक्षा पाहू नका.'' एकजण म्हणाला.
''लगेच दुसरा छापा धोक्याचा होईल.'' दुसरा म्हणाला.
''मुळीच नाही. आपली पद्धत उत्तम आहे. दुसरा छापा पडेल अशी कल्पना कुणालाच नसेल. कारण चोर पकडले गेले आहेत. पहिल्या वेळी जसे केले तसेच सारे करायचे.''
सावना म्हणाला, ''पण बिरची आणि डेका निर्दोष आहेत हे पोलिसांना कळेल.''
''म्हणून काय झाले? आज ना उद्या ते कळणारच. पण आपल्याला बराच पैसा मिळेल ह्या छाप्यातून हे लक्षात ठेवा'' साऱ्यांच्याच चेहऱ्यांवर हावरटपणा चमकला.
त्यांची मने वळवणे प्रमुखाला अवघड गेले नाही.
त्यांचे बोलणे ऐकून मुले तिथून सटकली.
''मी त्या प्रमुखाला ओळखले, तो इथला दुकानदार आहे. बाकीचे कोण ते मात्र माहीत नाही.''
''आपल्याला जे शक्य होते ते आपण केले आहे. आता पुढचे काम पोलिसांचे आहे.''
मंगलने त्यांना बंगल्यावर पोहोचवले. त्यांचा घाईने निरोप घेऊन तो अंधारात दिसेनासा झाला.



## X

बडबड्या नीलकंठ पक्ष्यांच्या जोडीच्या भांडणाने दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे मुलांना जाग आली. ते उठून सरळ बारूआंकडे धावले.

भुयार, नदीकाठची वाट, व्यापाऱ्याशी असलेली घसट, सारे बारूआंनी खिन्नपणे ऐकून घेतले.

त्यांनी पोलिसांना फोन केला. कोटोकी ताबडतोब आले. मुलांनी त्यांना घडलेले सांगायला सुरुवात केल्यावर प्रथम त्यांनी उडवाउडवी केली. पण जसजशी मुलांनी पुढची घटना सांगायला सुरुवात केली तसे ते शरमिंदे झाले.

शेवटी तर त्यांना मुलांवर प्रथम अविश्वास दाखवल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करावी लागली. ''पोरांनो, तुम्ही उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे.'' त्यांनी कौतुक केले. ''आताच टोळीला पकडायला हवे. आज रात्री ते प्रयत्न करतील. त्याच वेळी जाळे पसरायला हवे.''

बारूआंनी चहाच्या मळ्याचा नकाशा आणला. अचानक छुपा हल्ला करण्यासाठी भुयाराचे तोंड आणि नाव ह्या उत्तम जागा होत्या.

''ह्या ठिकाणी आपण पोलिसांची मोठी तुकडी ठेवूया. ते चहाच्या झुडपात लपतील.

मी स्वत: गुदामात राहून साऱ्या योजनेची सूत्रे हलवीन.''

''चहाची खोकी अतिशय जड असतात. भुयारातून एवढ्या लांब नदीपर्यंत त्यांनी कशी नेली असतील ? मला कल्पनाच येत नाही.'' बारूआ म्हणाले.

''खरे आहे'' कोटोकी म्हणाले. ''ह्याचा अर्थ त्यांच्याकडे काहीतरी वाहन असावे आणि त्याचा अजिबात आवाज येत नसावा.''

''पोलिसांच्या मदतीसाठी मी चहाच्या मळ्यातल्या मजुरांना बोलावू का ?'' बारूआ म्हणाले.

''नको. जास्त लोक झाले तर गोंधळ होईल. पोलिसांना अशा गोष्टींसाठी प्रशिक्षण दिलेले असते आणि मी त्यांना साधा पोशाखच घालायला सांगेन.''

राजवीर म्हणाला, ''रात्रीच्या अंधारात त्यांनी गणवेश घातला आहे की नाही ते कोणाला कळणार आहे ?''

''माझ्या डोक्यात जो बेत आहे त्यासाठी साधाच पोशाख आवश्यक आहे. शिवाय दुसऱ्या किनाऱ्यावर त्यांचा ट्रक असेल तोही विसरून चालणार नाही. आपण असे करू या...''

* * *

रात्र काळोखी आणि कोंदट होती. चंद्र आणि चांदण्या दिसत नव्हत्या. आकाश झाकोळले होते. सावल्यांमध्ये लपलेले पोलीस शस्त्र सावरत वाट पाहत होते.

गुदामात कोटोकी आणि इतर तिथे खोक्यांच्या ढीगामागे लपले होते. त्यांच्या हातात पिस्तुले होती.

बारूआ भुयारापासून थोड्या अंतरावर झाडाच्या सावलीत रायफल घेऊन उभे होते. अलका, प्रंजोल, राजवीर आणि मंगल त्यांच्यापाशी धडधडत्या छातीने कान टवकारून उभे होते. टॅफीही सावलीसारखा स्तब्ध बसून कानोसा घेत होता.

जळवा आणि डासांपासून संरक्षण होण्यासाठी त्यांनी अंगाला मीठ आणि सिट्रोनेला तेलाचे मिश्रण चोपडले होते.

त्यांच्या डोक्याभोवती संतापलेले डास घोंगावत होते.



डासांचे गुणगुणणे सोडले तर वातावरण शांत होते.

अचानक टॅफी ताठ झाला आणि गुरगुरला.

सारेच सावरून अंधारात डोळे ताणून पाहून लागले. खडखडाट ऐकू येऊ लागला. जरा वेळाने एक बैलगाडी पुढे येताना दिसायला लागली.







“सावनाचा बैल आहे तो.” मंगल दबक्या आवाजात म्हणाला. “बिबट्याने पळवलेला बैल बरं का.”

बैलगाडी भुयाराच्या तोंडाशी थांबली. त्यातून चार आकृत्यांनी खाली उड्या मारल्या

आणि त्यांनी घाईने बांबूची चौकट उचलली. तिघे बोगद्यात शिरले. चवथा बोगद्याबाहेरच थांबला.

अंधारातच बैलगाडीत आगकाडी पेटली. गाडीवानाने कंदिल लावला. त्याच्या प्रकाशात गाडीवानाचा वण असलेला कुरूप चेहरा स्वच्छ दिसला. तो सावना होता.

वीस मिनिटांनी बोगद्याच्या तोंडाशी पहिले चहाचे खोके दिसले. बोगद्यापाशी असलेल्या माणसाच्या मदतीने सावनाने ते बैलगाडीत चढवले. झुडपात दडलेला पोलिस हलकेच कुजबुजला, ''सुरू करा'' आणि सगळ्या बाजूंनी बंदुका रोखून पोलिस हळूहळू पुढे सरकू लागले.

पेट्या चढवणारा माणूस गोंधळून उभा राहिला. त्याच्या हातात चढवल्या गेलेल्या बेड्याचा आवाज तेवढा त्याच्या मेंदूपर्यंत पोहोचला.

गुदामात चोरटे पेट्या उचलत असतानाच कोटोकी आणि त्यांचे सहकारी चोरावर झेपावले. तो टोळीप्रमुख होता. विलक्षण चपळाईने त्याने हातातले चहाचे खोके खाली टाकले. कमरेच्या पिस्तुलाला हात घालत तो जमिनीवर झेपावला, तोवरच कोटोकीच्या हातातले पिस्तुल उडाले. सावना ओरडला, कळवळला. गोळी त्याच्या उजव्या खांद्यात घुसली होती.

बंदुकीच्या आवाजाने भुयारातले दोघे जीव वाचवण्यासाठी जीवाच्या आकांताने धावले. ते थेट भुयाराच्या तोंडाशी असलेल्या पोलिसांच्या तावडीत सापडल्यावरच जागेवर उभे राहिले.

बैलगाडीजवळच्या चौघांना कैद करून गुदामात आणले गेले. बारूआ आणि मुले त्यांच्या मागोमाग तिथे घाईने आली.

''छान सावज मिळाले.'' कोटोकी हसत बारूआंना म्हणाले. ''नावेतले त्यांचे साथीदारही आमच्या पोलिसांच्या पहाऱ्यात इथे आत्ता पोहोचतीलच.''

पकडले गेलेले सारे उर्मट चेहऱ्याने कोटोकींकडे पाहत होते. जखमी प्रमुखाला मलमपट्टी करायला बारूआंनी कारखान्याच्या डॉक्टरांना बोलावणे पाठवले. गोळी बाजूने गेली होती. त्यामुळे जखम गंभीर स्वरूपाची नव्हती. डॉक्टर जखम बांधत असतानाच एक उग्र चेहऱ्याचा




पोलिस नाव चालवणाऱ्याला घेऊन गुदामात शिरला.

''हा पळून चालला होता. नदीतून धरून आणला त्याला. बेडकासारखा हातात पकडला की निसटायचा साहेब.''

* * *

नंतर त्यांनी ठरविलेल्या गोष्टी सहजपणे घडत गेल्या. कुणाला संशय येऊ नये म्हणून त्यांनी दोन तास जाऊ दिले. नंतर नाव चालवणाऱ्याला बरोबर घेऊन कोटोकी आणि बरेचसे पोलिस नदीच्या पलीकडच्या किनाऱ्याकडे निघाले.



चहाच्या खोक्यांऐवजी बोटीतून पोलिसांची मोठी तुकडी येताना पाहून ट्रकवाला आणि त्याचे साथीदार भयंकर घाबरले. पळण्याचा प्रयत्न करायचे भानही त्यांना उरले नाही. ते पोलिसांना शरण गेले.

त्या रात्री पकडलेल्या टोळीने दिलेल्या माहितीवरून पोलिसांनी शहरातल्या एका गुदामावर छापा घातला. आधी चोरीला गेलेल्या सगळ्या चहाच्या पेट्या त्यांनी हस्तगत केल्या.

नाहीशा झालेल्या चहाच्या खोक्यांचे रहस्य दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत पूर्णतः उलगडले गेले होते.





Printed at India International Press, A-12/1, Naraina Industrial Area, Ph-I, New Delhi-28